THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 27TH JULY 1893.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख २६वी जून सन १८९३ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९३चा आक्ट नंबर ८ वा.

**सन १८७०चा हिंदुस्तानचे नाण्याचा आक्ट व सन १८८२चा हिंदुस्तानचा कागदी नाण्याविषयीं आक्ट हे सुधारण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थी सन १८७० चा हिंदुस्तानचे नाण्याचा आक्ट व सन १८८२ चा हिंदुस्तानचा कागदी नाण्याविषयीं आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे.

१. (१) या आक्टास सन १८९३ चा हिंदुस्तानचा नाण्याविषयीं व कागदी नाण्याविषयीं आक्ट असें ह्मणावें; आणि — सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. या आक्टास जोडलेल्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेले कायदे, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या आसनांत सांगितलें आहे तेथवर व त्या रीतीनें, रद्द किंवा कंपेश केले आहेत असें समजावें, मात्र याप्रमाणें रद्द किंवा कंपेश केल्यावरून, सदर्हू कायद्यांअन्वयें किंवा त्यांपैकीं कोणत्याहि कायद्याअन्वयें जी कोणतीहि गोष्ट आधींच करण्यांत आली असेल तिला, किंवा यापूर्वी जो कोणताहि हक्क संपादन झाला असेल त्याला अगर जबाबदारी प्राप्त झाली असेल तिला, कोणत्याहि प्रकारें व्यत्यय येतो असें समजूं नये. — विद्यमान कायदे रद्द करणें.

## परिशिष्ट.

| नंबर, वर्ष व लहान सरनामा. | कलमें. | किती रद्द किंवा कंपेश केलीं तें. |
|---|---|---|
| सन १८७० चा आक्ट २३वा (सन १८७० चा हिंदुस्तानचे नाण्याचा आक्ट). | १९ तागाईत २६, दोन्हीं धरून. | सर्व रद्द करावयाचीं. |
| सन १८८२ चा आक्ट २०वा (सन १८८२चा हिंदुस्तानचा कागदी नाण्याविषयींचा आक्ट). | ११ | रकम (ब), रकम (ड), व विशेष ठराव, हीं रद्द करावयाचीं. |
| | १२ | "(ब) रकमेंत" हे शब्द गाळावयाचे. |
| | १३ | या कलमांच्या बदला खालील कलम दाखल करावें:—<br>"१३. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे वेळोवेळीं इंडिया ग्याझेटांत हुकुम जाहीर करून, हिंदुस्तान सरकारच्या भरपूर वजनाच्या सोन्याच्या नाण्याच्या बदला, किंवा परराज्याच्या सोन्याच्या नाण्याच्या बदला अगर सोन्याच्या बदला, त्या हुकुमांत जे दर व ज्या कानू व शर्ती ठरविल्या असतील त्या दरांनीं व त्या कानू व शर्ती यांअन्वयें, चलनी नोटी, त्या हुकुमांत लिहिलेल्या [नोटी] देण्याच्या कचेऱ्यांतून द्याव्या असें फर्माविण्यास मुखत्यार आहेत."<br>(सोन्याचे बदला नोटी देणें.) |
| | १४ व १९ | सर्व कलमें रद्द करावयाचीं. |
| | २१ | पोट-कलम (१) याच्या विशेष ठरावाबदल खालील मजकूर दाखल करावा:—<br>"मात्र इतकेंच कीं सदहूंप्रमाणें घेऊन सदहू कामाला लावलेलें कोणतेंहि नाणें किंवा सोनेंरूपें तितक्याच किंमतीच्या हिंदुस्तान सरकारच्या सोन्याच्या किंवा रूप्याच्या नाण्यास विकावें किंवा त्याच्या मोबदला द्यावें, आणि तें सोन्याचें किंवा रूप्याचें नाणें, विकलेल्या किंवा मोबदला दिलेल्या नाण्याच्या किंवा सोन्यारूप्याच्या ऐवजीं सदहूंप्रमाणें कामास लावून निराळें काढून ठेविलें पाहिजे."<br>पोट-कलम (२) रद्द करावयाचें. |
| | २८ | पोट-कलम (१), रकम (फ), गाळावयाची.<br>पोट-कलम (३) रद्द करावयाचें. |

(सही.) एस. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निंसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.